झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे
मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे-१६.
जा.क्र. झोपुप्रा/सप्रा/४६धानोरी/झोनिआ/१५६२८/२०१७
दिनांक :- १३/११/२०१७

# "झोपडपट्टी निर्मुलन आदेश"

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ ( प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे **'उपरोक्त अधिनियम'** असा करणेत येत आहे. ) चे कलम ३ अ (१) (२) अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता गृहनिर्माण विभागाकडील अधिसूचना क्र. झो.पु.यो.-२००४/प्र.क्र.-२१३/झोपसु-१ दि. ३०/०६/२००५ नुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची नियुक्ती केली आहे. उक्त प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणुन प्राधिकृत केले आहे.

ज्याअर्थी उक्त अधिनियमाच्या कलम ३ ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना या प्राधिकरणाकडून तयार करणेत आलेली आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मंजुरीने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि. ०१/१२/२००५ रोजी अंतिमत: प्रसिध्द करण्यात आलेली आहे. यापूर्वी धानोरी स.नं.४६-अ/२, ब , क योजना पूर्ण झालेली असून १२७ पात्र लाभार्थी यांना पुनर्वसनाचा लाभ देण्यात आलेला आहे.

ज्याअर्थी, उपरोक्त अधिनियमातील तरतूदीनुसार अनुसूचीमध्ये नमुद केलेल्या क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसक मे. रामेश्वर डेव्हलपर्स यांनी आर्किटेक्ट श्री. राहूल माळवदकर यांचेमार्फत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे प्रस्ताव दाखल केला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने सक्षम प्राधिकारी तथा महानगरपालिका, उपायुक्त विभागीय कार्यालय क्र.२, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांनी स.नं.४६/अ/२, धानोरी फेज-२, विश्रांतवाडी, पुणे या जागेवरील झोपडपट्टीचे सर्व्हेक्षण करुन उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार झोपडीधारकांची पात्रता निश्चित केलेली आहे. सक्षम प्राधिकारी तथा महानगरपालिका, उपायुक्त विभागीय कार्यालय क्र.२ यांनी सादर केलेल्या परिशिष्ट-२ मध्ये नमुद केल्याप्रमाणे सदर जमिनीवर एकुण १०७+५० (रस्ता रुंदीकरणातील) असे एकूण १५७ झोपडीधारक पात्र ठरलेले आहेत.

ज्याअर्थी, धानोरी स.नं.४६अ/२ पैकी येथील २५८८ चौ.मी. क्षेत्र दि.०१/०६/२००६ रोजीच्या राजपत्रान्वये गलिच्छ वस्ती म्हणून घोषित केल्याचे प्रसिध्द करण्यात आले आहे.

ज्याअर्थी, उपरोक्त अधिनियमाच्या कलम ३ (क)(१) मधील तरतुदीनुसार अनुसूचीमध्ये नमुद केलेले क्षेत्र हे कार्यालयाकडील आदेश क्र. जा.क्र. झोपुप्रा/कअतां/झोपुआ/२५७/२०१४ दि. १०/०२/२०१४ अन्वये 'झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र' म्हणुन घोषित केलेले आहे.

आणि ज्याअर्थी, अनुसूचीमध्ये नमुद केलेल्या क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र आदेश विहीत पध्दतीने प्रसिध्द झाला असुन विहीत कालावधीत कोणाचीही हरकत प्राप्त झालेली नाही. सबब 'झोपडपट्टी पुनर्वसन योजना' राबविणेकामी झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्रातील इमारती / झोपडया पाडून जमिन खुली करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी पांडूरंग पोले, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे उपरोक्त अधिनियमाचे कलम ३ ड सह १२ (१) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार खालील अनुसूचीमध्ये नमुद केलेले क्षेत्र हे 'झोपडपट्टी निर्मुलन क्षेत्र' म्हणुन घोषित करीत आहे. अनुसूचीमध्ये नमुद क्षेत्रातील सर्व झोपडया / बांधकामे हा आदेश प्रसिध्द झाल्यापासून ६ (सहा) आठवडयाच्या आत पाडून टाकून जमिन खुली केली पाहिजे. सदरचा आदेश हा खालील अटींवर देणेत येत आहे.

१. सदर आदेशापासून तीन महिन्याच्या मुदतीच्या आत विकसकाने योजनेचे नकाशे मंजूर करून प्रत्यक्ष बांधकाम सुरू केले पाहिजे.

२. विकसकाने योजनेचे काम चालू करणेपूर्वी विस्थापित होणाऱ्या पात्र लाभार्थींची राहणेची तात्पुरती पर्यायी व्यवस्था आवश्यक त्या सर्व सुविधांसह स्वखर्चाने केली पाहिजे.
३. विकसकाने पुनर्वसन घटकाच्या इमारतीचे बांधकाम दोन वर्षात पूर्ण केले पाहिजे.
४. इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर व इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र दिल्यानंतर एक महिन्यात विकसकाने सदनिकांचा / गाळयांचा ताबा लाभार्थींना दिला पाहिजे.
५. वाजवी व सबळ कारणामुळे इमारतीच्या बांधकामास विलंब झालेस मुख्य कार्यकारी अधिकारी, झो.पु.प्रा., पुणे यांचे निदेशानुसार विलंब कालावधीसाठी दंड आकारून मुदतवाढ देण्यात येईल.
६. विकसकाने योजनेच्या बांधकामाची गुणवत्ता राखण्यात कसूर केल्यास अगर बांधकामाची प्रगती समाधानकारक नसलेस विकसकावर उपरोक्त अधिनियमाच्या कलम १३ अन्वये कारवाई करण्यात येईल.
७. पात्र लाभार्थ्यांना पुनर्वसन योजनेतील सदनिकांचा / गाळयांचा ताबा दिलेनंतर एक महिन्यात विकसकाने संक्रमण शिबीर रिकामे केले पाहिजे.
८. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे नियमावलीनुसार योजनेतंर्गत आवश्यक ती सर्व कामे विकसकाने करणे बंधनकारक राहील.
९. २०१७ च्या मंजुर विकास योजनानुसार नियोजित २४.० मी ४५.० मी रस्ता आहे. तसेच विकास योजनेचे PS 54, PG 60, SM-170, M 5.6 , WW-4 Reinstated as per published plan V/s 26 असे आरक्षण असल्याने शासन नियमावलीतील SR 19 (1) च्या तदतूदीनुसार पुणे महानगरपालिकेस क्षेत्र हस्तांतरीत करणे विकसकावर बंधनकारक राहिल.

सदरच्या आदेशामुळे बाधीत होणा-या कोणत्याही व्यक्तीस आदेश प्रसिध्द झालेपासून ४ (चार) आठवडयांच्या आत उपरोक्त अधिनियमाच्या कलम ३ ड सह १२ (४) अन्वये विशेष न्यायाधिकरणाकडे अपील दाखल करता येईल आणि विशेष न्यायाधिकरणाचा निर्णय अंतिम राहील.

**अनुसूची**

| जमिनीचा तपशील | क्षेत्र (चौ.मी.) | चतु:सिमा |
|---|---|---|
| स.नं.४६/अ/२, धानोरी, विश्रांतवाडी, पुणे | २५८८.०० चौ. मी. | **पुर्वेस -** लागून स.नं.४६ पै |
| | | **पश्चिमेस -** स.नं.४६अ/२ पै |
| | | **उत्तरेस -** रस्ता |
| | | **दक्षिणेस -** स.नं.४६-अ/२ पै |

सदर योजनेसंबंधीची कागदपत्रे संबंधीतांना पाहणेसाठी या कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहेत. सदरचा आदेश हा माझे सही शिक्क्यानिशी देणेत आला आहे.

**(पांडूरंग पोले)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

**स्थळ :-** झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.
**दिनांक :-** १३/११/२०१८ .